(१८०)

Page 1.

# आषाढ श्रावण

पोपटी हिरव्या पायघड्यावरूनी
आला श्रावण हा सृजन
सणांमध्ये अग्रणी असे जिवंतिका पूजन
बाळासाठी आई करते प्रार्थना मनोमन -----
शीमाझीम शीमाझीम पावसात
चिंब भिजत आली नागपंचमी
प्रसन्न करण्यास नागराजाला
दूध, लाही, शिरा ठेवूया प्रसाद म्हणूनी -----
भगवान शंकराला प्रिय असतो
श्रावणातील सगळे सोमवार
तांदूळ, मूग, तीळ अन जवसाची
शिवामूठ वाहूनी भक्ती करू निवार -----
मंगळागौर जागविण्यास
आली सासरहून लाडकी लेक
सौभाग्यासाठी करूनी व्रत
जागरण करूनी खेळ खेळती अनेक -----
घरगुती सणसमारंभामध्येच
लागते राष्ट्रीय सणांची हजेरी
१५ ऑगस्टला फडकतो तिरंगा डौलात
सजते दिमाखात सरकारी कार्यालय कचेरी -----
लाटेवरती स्वार असतो उदरनिर्वाहाचा भार
म्हणूनी समिंदराला नारळ अर्पूनी ठेविती जाण
कोळीवाडीचा आनंद उत्सव नाचगाण्या संगे
नारळी पौर्णिमेस रंगतो छान -----
प्रेमाने ओवाळून बांधते
बहीण राखी प्रिय भाऊरायास
आगळी वेगळी रेशीम गांठ ती
स्नेहबंधाने जुळवीते हृदयास खास -----

P.T.O.

अष्टमीस काळ्यासावळ्या रात्री
वर्षाराणीसह ढगांच्या पाठखीलून
अवतरले बाळरूपात श्रीकृष्ण भगवान
अवघ्या कारागृहास दिले भेदूनी
दहीहंडी फोडूनी, गोपाल काला करूनी
कृष्णजयंतीस जाती सारे आनंदूनी ----

राबतो रात्रंदिवस शेतात
ढवळ्या पवळ्या कृषीवलांसाठी
कृतज्ञतेपोटी खास पोळा हा सण
असतो बैलांच्या विश्रांतीसाठी
पुरणपोळी नैवेद्यास, अंगावरती
हारफुलांच्या माळा, झूल शोभते पाठी ----

अशी सणावळी घेवूनी
आषाढ श्रावण वाढविती वैभव वसुंधरेचे
सप्रेमे सहभागी होतोच त्यात
उल्हासिते तन मन धरतीवरील मानवाचे
सण आणि ऋतूंचा हा अनोखा अनुबंध
संस्कृतीचा पाईक म्हणूनी पिढ्यान पिढ्या जपायचे ----

सौ विजया पुरुषोत्तम जोशी



